Series G7DEF

Set – 4

प्रश्नपत्रिका कोड
Q.P. Code **8**

अनुक्रमांक
Roll No.

परीक्षार्थींनी प्रश्नपत्रिकेचा कोड उत्तरपत्रिकेच्या मुखपृष्ठावर लिहिणे आवश्यक आहे.
Candidates must write the Q.P. Code on the title page of the answer-book.

- प्रश्नपत्रिकेत **11** छापील पाने आहेत; कृपया तपासून घ्या.
- प्रश्नपत्रिकेच्या उजवीकडे छापलेला कोड नंबर उत्तरपुस्तिकेच्या मुखपृष्ठावर लिहा.
- प्रश्नपत्रिकेत 8 प्रश्न आहेत; तपासून घ्या.
- **उत्तरे लिहताना प्रश्न क्रमांक दिलेल्या स्थानावर अवश्य लिहा.**
- प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटे देण्यात आली आहेत. प्रश्नपत्रिका 10.15 वाजता वाटण्यात येईल. 10.15 ते 10.30 या दरम्यान प्रश्नपत्रिका फक्त वाचायची आहे; उत्तरे लिहायला सुरुवात करू नये.
- Please check that this question paper contains **11** printed pages.
- Q.P. Code given on the right hand side of the question paper should be written on the title page of the answer-book by the candidate.
- Please check that this question paper contains 8 questions.
- **Please write down the Serial Number of the question in the answer-book at the given place before attempting it.**
- 15 minutes time has been allotted to read this question paper. The question paper will be distributed at 10.15 a.m. From 10.15 a.m. to 10.30 a.m., the candidates will read the question paper only and will not write any answer on the answer-book during this period.

# मराठी

# MARATHI

*वेळ : 3 तास*
*निर्धारित समय : 3 घंटे*
*Time allowed : **3** hours*

*गुण : 80*
*अधिकतम अंक : 80*
*Maximum Marks : 80*

8 **5108**



P.T.O.

**General Instructions :**

(i) *Question paper is divided into **Four** sections.*

(ii) *It has total **8** questions.*

(iii) ***Section A : 2** Questions No. **1** & **2***

(iv) ***Section B : 2** Questions No. **3** & **4***

(v) ***Section C : 3** Questions No. **5, 6** & **7***

(vi) ***Section D : 1** Question No. **8***

(vii) *Attempt questions as per specific instructions.*

(viii) *Write question no. in answer-book before attempting it.*

***सर्वसाधारण सूचना :***

(i) *ही प्रश्नपत्रिका **4** विभागात विभागलेली आहे.*

(ii) *प्रश्नपत्रिकेत एकूण **8** प्रश्न आहेत.*

(iii) *विभाग **A / अ मध्ये 2** प्रश्न आहेत. प्रश्न क्र. **1** ते **2***

(iv) *विभाग **B / ब मध्ये 2** प्रश्न आहेत. प्रश्न क्र. **3** ते **4***

(v) *विभाग **C / क मध्ये 3** प्रश्न आहेत. प्रश्न क्र. **5** ते **7***

(vi) *विभाग **D / ड मध्ये 1** प्रश्न आहे. प्रश्न क्र. **8***

(vii) *दिलेल्या निर्देशानुसार प्रश्नांची उत्तरे लिहा.*

(viii) *उत्तरे लिहिण्यापूर्वी उत्तरपुस्तिकेत प्रश्न क्रमांक लिहा.*

## विभाग – 'अ' : वाचन व आकलन (15 गुण)

## Section – 'A' : Reading and Comprehension (15 Marks)

1. **खालील उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

पु.लं. व सौ. सुनीताबाई आनंदवन परिवाराचे अविभाज्य घटक होऊन गेली. पु.लं. केवळ साहित्यिक म्हणूनच नव्हे तर माणूस म्हणूनही फार मोठे होते. शेकडो संस्थांना, नडलेल्यांना त्यांनी भरभरून मदत केली आणि हे सर्व करताना आपल्या दानशूरपणाचा डंका वाजणार नाही याचीही काळजी घेतली. सर्वांना हवेहवेसे वाटणारे, कुटुंबवत्सल चेहऱ्याचे एक अतिशय उमदे व्यक्तिमत्त्व. पुढे पु.लं.नी आम्हाला मुक्तांगणासाठी एक लाख रुपयांची देणगी दिली. 'मुक्तांगण' हे छोटे थिएटर होते. आनंदवनातील कुष्ठरुग्णांसाठी, अंध, अपंग, मूकबधिर मुलांसाठी, त्यांच्यातील सुप्त कलागुणांना वाव देऊन त्याचा आविष्कार घडविण्यासाठी 'मुक्तांगणाची' निर्मिती झाली. त्या वेळी वरोऱ्यात नाटक सिनेमा फारसे नसत. अधूनमधून कथाकीर्तन होई. कुष्ठरुग्णांना मोकळेपणी मिसळता येईल एवढी समाजाची धारणा नव्हती. ते करमणुकीसाठी आनंदवनातच पौराणिक, ऐतिहासिक नाटक करीत. शिवाय 'दंडार' नावाचा एक प्रकार असे. या नाटकात भूमिका करण्यापासून तो दिग्दर्शन, मेकअप, नेपथ्य सारी कामे तेच पार पाडीत. त्यांची ती जीवनविषयक ओढ पाहून पु.लं. प्रभावित झाले. जे गेले त्याचा खेद करीत न बसता जे आहे त्याचा उपयोग करून आनंदाने जगणारे आमचे कुष्ठरुग्ण पु.लं.ना भावले. ते त्यांच्या प्रेमातच पडले.

(a) दिलेला गद्य उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पर्यायांमधून निवडा. (कोणतेही **5**) **5 × 1 = 5**

(i) पु.लं. व सौ. सुनीताबाई कशाचे आविभाज्य घटक होते ?

(A) शेकडो संस्था (B) मुक्तांगण

(C) आनंद परिवार (D) साहित्य परिवार

(ii) पु.लं. चे व्यक्तिमत्त्व कसे होते ?

(A) प्रसन्न (B) उमदे

(C) आनंदी (D) रुबाबदार

(iii) पु.लं. नी एक लाख रुपये देणगी कोणाला दिली ?

(A) गरीब लोक (B) कामगार

(C) मुक्तांगण (D) नाटक

(iv) 'आनंदवन' हे कशाचे नाव आहे ?

(A) शिक्षणसंस्था (B) नाट्यसंस्था

(C) साहित्यसंस्था (D) कुष्ठरुग्णांसाठीची संस्था

(v) उताऱ्यात सर्वांना हवेहवेसे वाटणारे उमदे व्यक्तिमत्त्व म्हणून कोणाचा उल्लेख आला आहे ?

(A) सुनीता देशपांडे

(B) पु. ल. देशपांडे

(C) मुक्तांगणमधील कलाकार

(D) आनंदवनातील लोक

(vi) 'मुक्तांगण' काय होते ?

(A) छोटे थिएटर (B) सिनेमागृह

(C) गावाचे नाव (D) इस्पितळ

(b) दिलेल्या गद्य उताऱ्याच्या आधारे पुढील प्रश्नांची **एका** वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही **3**) **3 × 1 = 3**

(i) गरजूंना दान करतांना पु.लं.नी कोणती काळजी घेतली ?

(ii) 'दंडार' या नाट्यप्रकाराचे वैशिष्ट्य कोणते होते ?

(iii) मुक्तांगणाची निर्मिती कशासाठी झाली ?

(iv) कुष्ठरोगी स्वतःची करमणूक कशी करून घेतं ?

2. **पुढील कविता काळजीपूर्वक वाचा व विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

या काळाच्या भालावरती तेजाचा तू लाव टिळा
आणि फुलू दे तुझ्या श्रमातुन मानवतेचा इथे मळा
नित्य नवी तू पाही स्वप्ने, साकाराया यत्न करी
सूर्यफुलाच्या फुलतीबागा, उजेड यावा घरोघरी
वाहत येवो समृद्धीच्या नद्याच सगळ्या खळाखळा
काट्यांमधल्या वाटांमधुन चालत जा तू पुढे पुढे
या वाटा मग अलगद नेती पाऊसभरल्या नभाकडे
झळा उन्हाच्या सरून जातील नाचत थेईल पाणकळा
अंधाराला तुडवित जाऊन घेऊन ये तू नवी पहाट
कणाकणांना उजेड देऊन उजळ धरेचे दिव्य ललाट
डोंगर सागर फत्थर यांना सुवर्ण सुंदर देई कळा
आणि फुलू दे तुझ्या श्रमातून मानवतेचा इथे मळा

(a) कविता वाचून विचारलेल्या प्रश्नांची अचूक उत्तरे दिलेल्या पर्यायांमधून निवडा. (कोणतेही 4) **4 × 1 = 4**

(i) कवी कोणता टिळा लावण्यास सांगत आहे ?
(A) कुंकवाचा (B) तेजाचा
(C) गंधाचा (D) केशराचा

(ii) टिळा कोणाच्या भालावर लावायचा आहे ?
(A) देवाच्या (B) बाळाच्या
(C) काळाच्या (D) स्वतःच्या

(iii) श्रमातून कोणता मळा फुलणार आहे?
(A) फुलांचा (B) फळांचा
(C) श्रमांचा (D) मानवतेचा

(iv) वाटा कोठे नेणार आहेत ?
(A) घराकडे (B) रानाकडे
(C) पाऊस भरल्या नभाकडे (D) अंधाराकडे

(v) कणाकणांना उजेड देऊन कवी कोणाचे दिव्य ललाट उजळायला सांगत आहे ?
(A) सागराचे (B) आभाळाचे
(C) धरेचे (D) नद्याचे

(b) वरील कवितेच्या आधारे पुढील प्रश्नांची **एका** वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही **3**) **3 × 1 = 3**

(i) प्रयत्न केल्यानंतर कोणत्या बागा फुलणार आहेत ?
(ii) कोणत्या नद्या वहात याव्यात ?
(iii) कवी तरुणाला कुठून चालत जायला सांगत आहे ?
(iv) पहाट घेऊन येणाऱ्या तरुणाने काय करावे ?
(v) तरुणाने सुवर्णसुंदर कशाला करावे, असे म्हटले आहे ?

## विभाग – 'ब' : व्याकरण (20 गुण)
## Section – 'B' : Grammar (20 Marks)

3. (a) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 4) **4 × 1 = 4**

(i) खालील पर्यायांतून सामान्य नामाचा योग्य पर्याय निवडा.

(A) सावकाश (B) झाड

(C) गोड (D) गौरी

(ii) 'त्या छोट्या खोलीत जागा अपुरी होती.'

– या वाक्यातील 'छोट्या' या शब्दाची जात कोणती ?

(A) विशेषण (B) नाम

(C) उभयान्वयी अव्यय (D) क्रियाविशेषण

(iii) 'तुम्ही' या शब्दाची जात कोणती ?

(A) नाम (B) सर्वनाम

(C) क्रियापद (D) संज्ञा

(iv) अर्थपूर्ण वाक्य तयार करण्यासाठी रिकाम्या जागी योग्य शब्दयोगी अव्ययाचा वापर करा.

यश मिळविण्या ________ प्रयत्न करावे लागतात.

(A) शिवाय (B) करिता

(C) पेक्षा (D) वाचून

(v) वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ओळखा.

मी <u>उद्या</u> तुझ्या घरी येईन.

(A) उभयान्वयी अव्यय (B) विशेषण

(C) सर्वनाम (D) क्रियाविशेषण अव्यय

(b) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 3) **3 × 1 = 3**

(i) दुकान उद्या उघडेल. (काळ ओळखा.)

(ii) तिला अंधाराची खूप भिती वाटली. (भविष्यकालीन वाक्य तयार करा.)

(iii) जत्रेमुळे गावात गर्दी होईल. (वर्तमानकालीन वाक्य तयार करा.)

(iv) रश्मी काम संपल्यावर घरी जाते. (भूतकालीन वाक्य तयार करा.)

(c) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही **3**) **3 × 1 = 3**

(i) संगीताला आई भेटली का ? (वाक्याचा प्रकार ओळखा.)

(ii) आज गावी जाणे सोईचे नाही. (विधानार्थी होकारार्थी वाक्य तयार करा.)

(iii) सुखदाने आई बरोबर जावे. (आज्ञार्थी वाक्य तयार करा.)

(iv) मी तुझा डबा आणावयास विसरले. (उद्‌गारार्थी वाक्य तयार करा.)

(d) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही **2**) **2 × 1 = 2**

(i) खालीलपैकी निश्चितपणे एकवचनी शब्द कोणता, ते ओळखा.

(A) कागद (B) भिंत

(C) देव (D) लेखक

(ii) शेतात गाय आहे.

(अधोरेखित शब्दाच्या वचनामध्ये बदल करा.)

(iii) 'टाळी' या शब्दाचे वचन बदलून लिहा.

4. (a) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही **2**) **2 × 1 = 2**

(i) पुढीलपैकी भिन्नलिंगी शब्दाचा योग्य पर्याय निवडा.

(A) पुस्तक (B) काम

(C) चित्र (D) देखावा

(ii) लिंगविचारानुसार गटात न बसणारा शब्द कोणता ?

(A) गायक (B) रसिक

(C) गीत (D) वक्ता

(iii) 'मोर' – या शब्दाचे लिंग बदला.

(A) मोरणी (B) मोरण

(C) मैना (D) लांडोर

(b) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही **2**) **2 × 1 = 2**

(i) खालीलपैकी समानार्थी शब्दाची योग्य जोडी कोणती ?

(A) चेहरा = हसरा (B) चंद्र = चांदणे

(C) विजय = यश (D) पत्र = नेत्र

(ii) उदक–समानार्थी शब्द लिहा.

(A) द्रावण (B) बाष्प

(C) पाणी (D) संपत्ती

(iii) खालीलपैकी गटात न बसणारा शब्द कोणता ?

(A) कर्तृत्व (B) पराक्रम

(C) शौर्य (D) लढाई

(c) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 2) $2 \times 1 = 2$

(i) खालीलपैकी विरुद्धार्थी शब्दांची योग्य जोडी कोणती ?

(A) सुरेख × सुंदर (B) घटना × प्रसंग

(C) मोठा × लहान (D) सरिता × नदी

(ii) 'थंड' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द पुढील पर्यायांतून ओळखा.

(A) शीत (B) गरम

(C) गार (D) शांत

(iii) 'माता' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द पुढील पर्यायांतून ओळखा.

(A) आई (B) जननी

(C) पिता (D) माय

(d) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 2) $2 \times 1 = 2$

(i) खालीलपैकी समास प्रकाराच्या गटात न बसणारा शब्द कोणता ?

(A) नवरात्र (B) अडाणी

(C) दररोज (D) राजाराणी

(ii) आजीने बाजारातून भाजीवाला आणल

– अधोरेखित शब्दाचा समास ओळखा.

(A) द्विगु समास (B) इतरेतर द्वंद्व समास

(C) बहुव्रीही समास (D) समाहार द्वंद्व समास

(iii) 'दररोज' या शब्दाचा समास पुढीलपैकी कोणता ?

(A) द्विगु समास (B) अव्ययीभाव समास

(C) समाहार द्वंद्व समास (D) वैकल्पिक द्वंद्व समास

## विभाग – 'क' – पाठ्यपुस्तकावर आधारित (30 गुण)
## Section – 'C' – Text book based (30 Marks)

5. (a) पुढील प्रश्नांची केवळ **एका** वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही 3) $3 \times 1 = 3$

(i) पु. ल. देशपांडे व सुनीताबाईंनी लेखकाला कोणती भेट दिली ?

(ii) अब्दुल तपोवनामध्ये कोणकोणत्या दिवशी जात असे ?

(iii) रेखामावशीच्या पावलांचा रंग कोणता उमटला होता ?

(iv) डॉ. माशेलकरांनी 'संस्कार केंद्रे' कशास म्हटले आहे ?

(v) कथेची थोरली बहीण कोण ?

(b) खालील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य शब्दाचा पर्याय शोधून वाक्ये पुन्हा लिहा. (कोणतेही 3) $3 \times 1 = 3$

(i) 'नाही रे बाळा, तू उत्तम ________ आहेस.'

(A) विद्यार्थी (B) मुलगा (C) नागरिक (D) खेळाडू

(ii) पण इथले शिक्षक मात्र ________ खूप श्रीमंत होते.

(A) पैशाने (B) शिक्षणाने (C) मनाने (D) धनाने

(iii) कुटुंबाचा मात्र माझ्या ________ बाबतीतला उत्साह अवर्णनीय होता.

(A) वजनाच्या (B) पैशाच्या (C) डाएटच्या (D) आहाराच्या

(iv) सत्कार करण्याएवढे मी काय केले आहे ________ ?

(A) समाजासाठी (B) कुटुंबासाठी (C) तपोवनासाठी (D) विद्यार्थ्यांसाठी

(v) ________ वर्षावाखाली त्यांची शालीनता कधी हरवली नाही.

(A) प्रसिद्धीच्या (B) पैशाच्या (C) शालींच्या (D) सत्काराच्या

(c) खालीलपैकी **एका** प्रश्नाचे 30 ते 40 शब्दांत उत्तर लिहा. (कोणतेही 1) $1 \times 3 = 3$

(i) कवितेने करून दिलेली स्वतःची ओळख तुमच्या शब्दांत लिहा.

(ii) पाठाआधारे निरंजनच्या विद्यार्थी जीवनाचा परिचय तुमच्या शब्दांत थोडक्यात लिहा.

(iii) पृथ्वीच्या वातावरणातील दूषितपणा कमी करण्यासाठी आपण कोणते उपाय करू शकतो, ते तुमच्या शब्दांत लिहा.

(d) कंसात दिलेल्या वाक्प्रचारांचा खालील वाक्यांतील योग्य त्या ठिकाणी वापर करून वाक्य पुन्हा लिहा. **5 × 1 = 5**

(वाव नसणे, कीव येणे, अंगाचा तिळपापड होणे, आर्जव करणे, अंगावर काटा उभा रहाणे, उत्साहाला उधाण येणे)

(i) शहरातील मुलांना जागेअभावी मैदानी खेळ खेळण्याची संधीच मिळत नाही.

(ii) तो भयंकर अपघात पाहून मला खूप भीती वाटली.

(iii) खेळताना चेंडूमुळे खिडकीची काच फुटलेली पाहून काकांना प्रचंड राग आला.

(iv) कार्यालयीन कामकाजाची वेळ संपल्यामुळे त्याने खूप विनंती करूनही काही उपयोग झाला नाही.

(v) मुसळधार पावसामुळे चिंब भिजलेल्या कुत्र्याच्या पिलाची मला दया आली.

6. (a) पुढील प्रश्नांची **एका** वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही 4) **4 × 1 = 4**

(i) कवीचे हात कोणाकडे गहाण राहिले आहेत ?

(ii) घराघरांतून कोण जन्म घेते ?

(iii) कवयित्रीला डोळे भरून काय पहावयाचे आहे ?

(iv) हरणी केव्हा चिंतीत होते ?

(v) दुःख पेलून कसे जगावे, हे कवी कोणत्या शाळेत शिकले ?

(vi) संत नामदेवांनी मेघ कोणास म्हटले आहे ?

(b) खालील वाक्यांतील रिकाम्या जागी योग्य शब्द भरून वाक्य पुन्हा लिहा. (कोणतेही 4) **4 × 1 = 4**

(i) फुलामुलांतून हसतो _________

(A) पाऊस (B) श्रावण

(C) निसर्ग (D) भारत

(ii) काय करावे कळेना, नाही _________ सामर्थ्य

(A) पैशाचे (B) बळाचे

(C) कष्टाचे (D) द्रव्याचे

(iii) धेनु _________ धांवे ।।

(A) रानाकडे (B) हुंबरत

(C) घराकडे (D) वत्साकडे

(iv) हस्त _________ हवा एकदा

(A) कृपाळू (B) मदतीचा

(C) बलवान (D) शुभंकर

(v) हे _________ माझे सर्वस्व

(A) आयुष्य (B) हात

(C) सुख (D) धन

(c) खालीलपैकी कोणत्याही **एका** काव्यपंक्तीचे संदर्भासह स्पष्टीकरण करा. (कोणतेही **1**) **1 × 3 = 3**

(i) दीनदुबळ्यांचे असें, तुला एकच औक्षण

(ii) हजार आम्ही एकी बळकट, सर्वांचे हो एकच मनगट

7. खालील प्रश्नांची **एका** वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही **5**) **5 × 1 = 5**

(i) मराठीतील 'अत्तर' शब्द मूळ कोठून आला आहे ?

(ii) 'मोठे होत असलेल्या मुलांनो....' या पाठाच्या लेखकाचे नाव काय आहे ?

(iii) १९३८ साली अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन कोठे भरले होते ?

(iv) लेखकाने बार्कमध्ये काम करताना वरिष्ठांकडे कोणती मागणी केली ?

(v) मराठीतील 'आग' हा शब्द कोणत्या शब्दापासून आला आहे ?

(vi) भारतातील अणुसंशोधनाचा पाया कोणी घातला ?

(vii) व्युत्पत्ती कोशाचे पहिले प्रकाशन केव्हा झाले ?

## विभाग–'ड' : लेखन (15 गुण)

## Section – 'D' : Writing (15 Marks)

8. (a) दिलेले निबंध मुद्‌दे व कथा मुद्‌दे काळजीपूर्वक वाचा व दिलेल्या पाच विषयांपैकी कोणत्याही एका विषयावर **120 – 150** शब्दांत निबंध अथवा कथा लिहा. (कोणतेही **एक**) **1 × 5 = 5**

(i) **एका वृद्धाचे मनोगत**

मुद्दे – बालपण – बालपणीचा आनंद – खेळ शिक्षण, स्वप्ने – जीवनशैली – तरुणपणीचा संघर्ष – कठीण परिस्थितीतून मिळालेले धडे – मित्रांची व कुटुंबाची साथ – आजच्या बदलत्या संस्कृतीबद्दलचे मत – वृद्धावस्थेत शारीरिक व मानसिक आव्हाने – एकटेपणा – नव्या पिढीला सल्ला.

(ii) **देव बोलू लागला तर....**

मुद्दे – स्वप्न – लोकांच्या श्रद्धा – भक्तांची विविधता – देवाकडे मागण्यापेक्षा प्रयत्न अपेक्षित – नैतिकता आणि जीवनमूल्ये महत्त्वाची – वाढती गर्दी – ध्वनिप्रदूषण – अस्वच्छता – बाजारीकरण – खऱ्या भक्तीला पारखा – शांत, प्रेम, एकता आणि मानवतेचा संदेश

(iii) **मी पाहिलेली जत्रा**

मुद्दे – मित्राचे गाव – लहान गाव – देवाचा उत्सव – इतर गावातील पै-पाहुण्यांचा सहभाग – मनोरंजन – जादूचे खेळ, पाळणे – खाद्यपदार्थ, मिठाई, खेळणी – धार्मिक उत्सव – गावच्या संस्कृतीचे दर्शन – स्थानिक लोकांचा व्यापार – आनंददायी समृद्ध करणारा अनुभव.

**किंवा/OR**

कथाविषय व मुद्द्दे – शीर्षक व तात्पर्य आवश्यक.

(i) मुद्दे – भिकारी – भीक मागतो – देवाची प्रार्थना – देव प्रसन्न – सोन्याच्या मोहोरा मागतो – थांब म्हणेपर्यंत देईन – अतिलोभ – झोळी फाटते – मोहोरा खाली पडून त्याची माती – देव अदृश्य – भिकारी पुन्हा भिकारीच

(ii) शेतकरी कोंबडी विकत घेतो – कोंबडी सोन्याचे अंडे देते – रोज देऊ लागते – तिच्या पोटात खूप अंडी – लोभ – एकदम सगळी घ्यावी – तिला मारले – कोंबडीचा मृत्यू – पश्चाताप

(b) खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर पत्र लिहा. (लिफाफा आवश्यक) **1 × 5 = 5**

(i) आकाश/आकांक्षा पोतदार, पंचवटी, नाशिक येथून आपल्या परिसरातील बागेच्या दुरावस्थेबाबत आयुक्त, महानगरपालिका, नाशिक यांना तक्रार पत्र लिहितो/लिहिते.

(ii) गौरव/गौरी देशमुख, विद्यार्थी प्रतिनिधी, सरस्वती विद्यालय, पुणे येथून शाळेच्या सहलीसाठी एस.टी. बस डेपो, स्वारगेट, पुणे येथील व्यवस्थापकांना गाडीची मागणी करणारे पत्र लिहितो/लिहिते.

(c) खालील दिलेल्या विषयावर जाहिरातलेखन करा. (कोणतेही **1**) **1 × 5 = 5**

(i) तुमच्या परिसरात नव्याने सुरू झालेल्या बझारची जाहिरात तयार करा.

(ii) कपड्याच्या दुकानाची जाहिरात तयार करा.